# ग्रामदानानेच ग्रामस्वराज्य स्थापन होऊन सर्व समस्या मिटतील


साम्ययोग दैनिक पुरवणी

# विनोबा-वार्ता

मासिक वर्गणी १.५० न. पै.

अंक : ६७] सेवाग्राम, सोमवार ता. २५ मे १९६४ [मूल्य ५ न. पै.


## गावाला भिकेला लावणाऱ्या वाटा
## मुलांच्या व बैलांच्या मुसक्या काढा

काल आम्ही वरखेडला होतो. वरखेड हे सत्पुरुषाचे गांव आहे. तेथे तुकडोजी महाराजाचे गुरू होते. तेथे ग्रामदानाचा उत्तम प्रयत्न चालला आहे. थोडया सह्या व्हायच्या आहेत तेथील गावकरी मंडळी त्या लवकच पूर्ण करतील असे त्यांनी आश्वासन दिले आहे. तुकडोजी महाराज मुंबईवरून मी वरखेडला आलो हे ऐकून आले. संध्याकाळी त्यांची सुंदर भजने ऐकली.

### गावाचा तिसरा हिस्सा परकियांच्या ताब्यात

सकाळी इसापूर ग्रामदान झाले. व वरदा नदी ओलांडून इकडे आलो ती वरदाच आहे. हे गाव ग्रामदान झाले नाही तर त्याला फार मोठे भय आहे. कारण ह्या गावाची एक तृतिआंश जमीन बाहेर गावच्या लोकांच्या हातात आहे. गावाची जमीन बाहेर मालकाच्या हातात गेली तर गावात जास्त मजूरच राहतील. व गावातील कोणतीहि योजना होऊ शकणार नाही. आपल्या हिंदुस्तानची थोडीशी डोंगराळ जमीन चीनच्या ताब्यांत आहे. पण ती आपल्या ताब्यात घेण्यासाठी नऊशे कोटी रूपये दरवर्षी खर्च होत आहेत. आणि त्यासाठी केवढा मोठा आटापिटा करावा लागतो. भारताचे काही जिल्हे परक्याच्या ताब्यात गेले असते तर स्वराज्याला उणेपणा आला असता व स्वराज्यानंतरची योजना बनू शकली नसती. तुमच्या गावाची एक तृतिआंश जमीन बाहेर गावच्या लोकांच्या ताब्यात जाणे म्हणजेच भारताचे पांच प्रांत दुसऱ्या देशाच्या ताब्यात जाण्यासारखे आहे तेव्हां ग्रामस्वराज्य व्हायचे असेल तर गावाची जमीन गावातच राहयला हवी.

### मला सर्टिफिकेट मिळाले

लोक समजतात बाबा विद्वान आहे. त्याचे भाषण खेडयातील लोकांना कसे काय समजत असेल. पण बाबाला विद्वत्ता दाखवायची असती तर तो प्रोफेसर झाला असता पण मी माझी परिक्षेची सर्टिफिकीटे केव्हांच जाळून टाकली पण नुकतेच मला चिकणी गावाने सर्टिफिकेट दिले की ग्रामदानाचा विचार सुलभ व सोपा आहे पण पुढच्या कामासाठी तुमच्या मार्गदर्शनाची आम्हाला गरज आहे. हे जे सर्टिफिकेट मला मिळाले आहे आणि त्यात म्हटले आहे की, ग्रामदान प्राप्तीसाठी तुम्हाला आमच्या गावात येण्याची गरज नाही इतके ते सोपे आहे तेव्हा या सर्टिफिकेटच्या आधाराने वर्धा जिल्हा किंवा आर्वी तालुका दान व्हावा अशी मी इच्छा करतो.

### उलटी गंगा सरळ वाहू द्या

तिसरा हिस्सा बाहेरगावी गेलेली जमीन ती परत गावात कशी आणायची ? हे मी आता सांगू शकत नाही. पण जी तुमच्याजवळ आहे ती कायम राखा. आणि बाहेरच्या लोकांच्या मगरमिठीत जी जमीन आहे ती गावात कशी आणायची ह्याचा विचार करावा लागेल. मालकी व जमीन ह्या दोन्ही गोष्टी तुम्ही तुमच्या दुर्बल हाताने पकडू शकत नाहीत. ह्या दुबळया हातातून जमीन निघून जाईल. तेव्हा तुम्ही मालकी सोडा व जमीन पकडा. मी एका मुलाची गोष्ट सांगतो. एक होते पोर, त्याला काढायचे होते बोर, त्याने भांडयांत हात घातला बोरांची मूठ भरून घेतली पण ती भांडयाच्या बाहेर त्याला काढता येईना. तेव्हा बोरे सोडून हात काढावा लागला. तसे आज आपले जमिनीच्या मालकीबाबत चालले आहे. तुम्ही ग्रामदान केले व वीसावा हिस्सा जमीन भूमिहीन मजूराला दिली तर गावात शांति, संतोष व पुष्टी राहील. नाही तर काही एक राहणार नाही व सर्व तोटरी नुकसान होईल. "तुका म्हणे आहे सोपे सर्वाहुनी" हे सोपे काम संध्याकाळपर्यंत पूर्ण करा. आज तुमच्या गावात ९६ लोकाजवळ जमिनी आहेत व १३६ भूमिहीन कुटुंबे आहेत. म्हणजे आजच्या भूमिहिनाकडून जमिनी शेतकऱ्याकडे आल्या व शेतकऱ्यांच्या हातून बाहेरच्या लोकाकडे गेल्या. पूर्वी त्या सर्वाकडे होत्या. मग मोठया शेतकऱ्याकडे गेल्या. त्यांच्या जवळून गावाबाहेर गेल्या. आता इंग्लंडच्या हातात पोचायच्या म्हणजे प्रक्रिया पूर्ण झाली असती पण स्वराज्याने ह चक्र थांबविले आहे. तेव्हा आता तुमच्या जमिनी भूमिहिनाकडे जाऊ द्या. म्हणजे बाहेरच्या लोकांची जमीन तुमच्याकडे येईल. तुम्ही त्यांना सांगाल की, मालकी ग्रामसभेला अर्पण करा. तुमच्या जमिनी आम्ही कसून देऊ. तुमचा माल बरोबर पोहचवू. आता वीसावा हिस्सा जमीन फक्त तुम्ही भूमिहिनांना द्या.

तुम्ही आजपर्यंत उलटी गंगा वाहविली. जमिनी खालून वर ढकलण्याचे काम केले. आता इतके कठीण काम ज्या पुरुषार्थी व पराक्रमी लोकांनी केले त्यांनी खाली ढकलण्याचे साधे सोपे काम करावे त्याने तुमचे गाव कुटुंब बनेल, तुमच्या गावात फक्त माणशी एक एकर जमीन आहे. पण जमीन चांगली असली तरी एका एकरात तुमचा निभाव लागत नाही त्यासाठी गावात ग्रामोद्योग उभे केले पाहिजेत.

### कमजोर व अमंगळ शरीर

सरकारला मी विचारले लोकांना काही मदत कराल की नाही ? पण ती मदत त्यांना आळशी ठेवून करायला नको. कोणत्यातरी उद्योगाद्वारा ती व्हावी. आणि त्यातून मोफत विणाईची कल्पना पुढे आली. आज कपडयापायी तुमच्या गावातून पंधरा हजार रुपये बाहेर जातात. ती शेतसाऱ्याच्या चौपट रक्कम आहे. कपडयाचा हा टॅक्स असा आहे की त्यातून लहान मुले, बाया बापडया आणि म्हातारे सुद्धा सुटत नाहीत. हा टोल टॅक्सच आहे. आमच्या लहानपणी सातव्या वर्षापर्यंत नागवे फिरत. त्यानंतर मुंज आणि उपनयन संस्कार झाला की लंगोटी मिळायची पण तेहि आम्हाला मोठे बंधन वाटायचे. नंतर मी बडोद्याला गेलो. तेव्हा धोतर नेसावे लागले. उष्णतेचा मोठा त्रास व्हायचा तेव्हा शाळेतून आल्यानंतर आम्ही धोतर केव्हा काढून टाकू असे व्हायचे. परंतु पाहुणे मंडळी आली म्हणजे शिष्टाचार म्हणून नाजिलाजाने कपडे वापरावे लागत. आता लहानपणापासूनच कपडे घालता, त्यामुळे काही अवयवांना मोकळी हवा, सूर्याची किरणे व पाणी लागत नाही. त्यामुळे ती कमजोर होतात घंगाळयात पाणी घालून स्नान करण्याची पद्धत आहे. घंगाळ म्हणजे गंगालयम्. त्यांत जेमतेम सहा लोटे पाणी मावते, निऱ्या दोन तीन इंच जाड असतात. तेव्हा ते पांच लोटी पाणी कपडयांतच अडकते. निऱ्यासुद्धां भिजत नाहीत. तर शरीर कसे धुतले जाईल. सर्व अमंगल राहते. मी सुरगांवला नग्न स्नानाची कल्पना दिली. सुरवातीला लोकांना कसेसेच वाटायचे. अडोसा तयार करून नंतर काही लोकांनी ती कल्पना स्वीकारली. लहानपणी तरी मुलांनी नागडे, उघडेच रहावे असा मी सल्ला देईन. त्याशिवाय लागणारा कपडा तुम्ही तयार करा. गावाची भांडणे गावात मिटवा.

### वारसाने मुलींना मिळणाऱ्या जमिनी

हिंदू कोडबिला प्रमाणे जमिनी मुलींना मिळतील. त्यामुळें जमिनी गावाच्या बाहेर जातील. त्यावर काय उपाय करायचा असे काही लोक विचारतात. जमिनी त्यांच्याजवळ राहू दे. पण मालकी त्यांनी गावाला द्यावी. व चाळीसावा हिस्सा ग्रामसभेला द्यावा. पुढे असे करावे लागणार की जमिनीच्या ऐवजी त्यांना थोडा पैसा द्यावा व जमीन गावात ठेवावी. ह्या कायद्यामुळे बाहेर गावच्या जमिनी ह्या गावाला व ह्या गावच्या जमिनी दुसऱ्या गावाला जातील. कारण ह्या गावच्या मुली दुसऱ्या गावाला दिल्या जाणार व दुसऱ्या गावच्या मुली ह्या गावाला येणार. तेव्हा हे कायद्याने सर्व साफ करावे लागेल. बाहेर गावच्या मालकाबाबतहि काही विचार करता येईल.

### कोर्ट बहिष्कार व सामूहिक लग्न

आज तुमची भांडणे कोर्टात जातात व गावे कंगाल बनतात. कोर्ट कचेऱ्या ओस पाडा. त्यासाठी गावातच भांडणे मिटवायची सोय करा.

आज वेगवेगळया तारखेला लग्न लागतात, कुंडलीप्रमाणे ग्रह पाहून लग्न होतात. माझे म्हणणे आहे, हनुमान जयंतीच्या दिवशी गावची सर्व लग्ने करावी. एरव्ही हे ग्रह बलवान असले तरी ते सर्व हनुमंताला भितात. तो महावीर भगवान तुम्हाला आशीर्वाद देईल. त्यामुळे तुमची मुले बलवान, विद्वान व सेवक निपजतील. एकच पुरोहित अनेक पुरोहितांचे काम करू शकेल. मुसलमान, हिंदू ह्यांनीहि एकत्र विवाह करावेत.

'बिसमिल्ला हिर्रहमा निर्रहीम,
रामकृष्ण हरी' असे मंत्र म्हणावे.

ह्यामुळे दोघांना दोन्ही आशीर्वाद मिळतील. त्याने काही कोणाचे बिघडणार नाही उलट डबल इंजिन लागेल. तेव्हा तुम्ही सामुदायिक लग्नाचा प्रयोग करावा. तुम्हाला मी जास्त काय सांगणार! मी पुस्तके वाचून तुमच्यासमोर बोलतो, तुम्ही साक्षात काम करीत असल्यामुळे सृष्टीकडून तुम्हाला आपोआप सुचते.

### पैशाची माया

तुम्ही शहरवाल्याच्या व पैशाच्या आहारी गेला आहात. मुलगा शिकला की विकलाच तो. म्हणतात याला अधिक हुंडा घ्यावा लागेल. बैल विकायला जातात तेव्हां त्याचे दात पाहतात त्याच्यावर तितका खर्च झाला असे म्हणून त्याची किमत लावतात. तसेच मुलाचा बाप म्हणतो ह्याला एम्. ए. केला. म्हणजे बैलाची विक्री ज्या मुद्यावर त्याच मुद्यावर हुंडा ठरतो. ही किती विचित्र गोष्ट आहे. विद्येची किमत पैशात


www.vinoba.in

